...निधी लेखा
महाराष्ट्र राज्य
...भवन, नवी मुंबई ४०० ६१४
दिनांक 15 JUL 2008
...क्र. ...
५१३४८

ग्रामपंचायत लेखा परिक्षणाची सुधारित कार्यपध्दती

शासन
वित्त विभाग
परिपत्रक क्रमांक : संकीर्ण - १००८/प्र.क्र.३४/कोषा प्र-५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ७ जुलै, २००८

प्रस्तावना - मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ५७ नुसार ग्रामपंचायतीच्या ग्राम निधीचे लेखा परिक्षण करण्याचे अधिकार कलम ३ (अ-२) नुसार मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा यांना आहेत. अकराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांचे विशेषत: ग्रामनिधीचे लेखांकन व लेखा परिक्षण पध्दती आधिक सुलभ व प्रभावी करुन सध्या मोठ्या प्रमाणात प्रलंबित लेखा परीक्षणाचा जलदगतीने जास्तीत जास्त प्रमाणात निपटारा करण्याच्या उद्दीष्टाने काही मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. यानुषंगाने प्रचलित लेखांकन व लेखा परीक्षण पध्दतीचा विचार करुन ग्रामपंचायतीचे लेखा परीक्षण करतांना पुढील सुधारीत मार्गदर्शक तत्वे तथा कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा --

परिपत्रक -

१. महालेखापालांकडून पंचायत समित्यांचे लेखापरीक्षण करण्यात येते, त्यावेळी पंचायत समित्यांच्या कार्यक्षेत्रातील निवडक ग्रामपंचायतींचे लेखा निरीक्षण (Account Inspection) करण्यात येतात (सर्वसाधारणपणे ५ टक्के ग्रामपंचायतींचे लेखानिरिक्षण होते). अशा निवडक ग्रामपंचायतींची यादी आणि लेखा निरीक्षणाच्या अहवालाची प्रत महालेखापालांच्या लेखापरीक्षा पथकाने संबंधित जिल्हयाच्या उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा यांना उपलब्ध करुन द्यावी. सदर अहवाल महालेखापालांच्या अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांच्या स्वाक्षरीने शक्यतो मराठी भाषेत असावेत. महालेखापाल यांच्याकडून ज्या ग्रामपंचायतीचे लेखा परीक्षण नियमित पध्दतीने पूर्ण झाले आहेत, अशा ग्रामपंचायतीचे लेखे मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा यांनी अशा ग्रामपंचायतीचे पुढील वर्षाचे लेखा परीक्षण पूर्ण करतांना महालेखापाल यांनी सदर ग्राम पंचायतीच्या तत्पूर्वी केलेल्या लेखा परीक्षण अहवालातील वार्षिक लेखे आवश्यक त्या तपासणीनंतर प्रमाणित करावे. जेणेकरुन प्रलंबित लेखा परीक्षणाचे काम गतिमान होऊ शकेल.

२. सन २००६-०८ अखेर प्रलंबित असलेल्या ग्रामपंचायतीचे लेखा परीक्षण पूर्ण करण्यासाठी अंतर्गत लेखापरीक्षणासाठी सध्या असलेल्या मनुष्यबळाचा वापर मुख्य लेखा परीक्षकांनी करावा. तसेच जिल्हा परीषदेकडून पुढील दोन वर्षासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी ग्रामविकास विभागाकडून स्वतंत्रपणे प्रशासकीय आदेश निर्गमित करण्यात येतील. जिल्हा परीषदेकडून अशा प्रकारे उपलब्ध होणाऱ्या अतिरीक्त मनुष्यबळाच्या आधारे मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा यांनी सन २००९-१० अखेर सर्व ग्रामपंचायतीचे प्रलंबित लेखा परीक्षण करण्यासाठी कार्यक्रम तयार करुन ते पूर्ण करावेत.

३. वरीलप्रमाणे प्रत्येक ग्रामपंचायतीच्या लेखा परीक्षणासाठी दरवर्षी स्वतंत्र पथक नेमले जाईल याची खात्री करण्यात यावी.

16/7/08

४: याशिवाय ग्रामपंचायतीच्या लेखा परीक्षणाबाबत पुढील कार्यपध्दतीचा ही अवलंब करण्यात यावा.

(१) ग्रामपंचायतीचे घटक मोजतांना सध्यस्थितील ग्रामविकास विभागाने वेळोवेळी सूचित केलेल्या योजनानिहाय घटकांच्या मर्यादेतच विचार न करता महाराष्ट्र ग्राम पंचायत (लेखा परीक्षण) नियम १९६१, नियम ७-क नुसार ग्रामनिधी व ग्रामपंचायतीस प्राप्त होणाऱ्या सर्व स्त्रोतातील (राज्य शासन, केंद्र शासन व ग्रामनिधी) निधीचे एका वर्षाचे केलेले लेखा परीक्षण हे एका घटकाचे लेखा परीक्षण समजण्यात यावे. तसेच असे लेखा परीक्षण एकाच लेखा परीक्षा पथकाकडून करण्यात यावे याबाबतची व्यापक कार्यपध्दती मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा हे विहीत करतील.

(२) ग्रामपंचायत लेखा परीक्षणाचा नियोजित मासिक कार्यक्रम सर्व संबंधित जिल्हा परीषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना तीन महिने अगोदर पाठविण्यात येईल. त्यानुसार जिल्हा परिषदेने संबंधित ग्राम पंचायतीला लेखा परीक्षणासाठी आवश्यक असलेले सर्व अभिलेखे वार्षिक लेख्यासह उपलब्ध करून ठेवण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

(३) लेखा परीक्षण पथकास लेखा परीक्षणाच्यावेळी जर संबंधित ग्रामपंचायतींनी परिपूर्ण अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत तर अभिलेख उपलब्ध न करण्याबाबतचे अहवाल थेट संबंधित मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पाठविण्याची जबाबदारी संबंधित उप मुख्य लेखा परीक्षकाची राहील. अशा प्रकरणी कर्तव्य पालनात कसूर केल्याबाबत संबंधित ग्रामसेवकावर मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

(४) ग्रामपंचायतीच्या सन २००६-०८ या वर्षातील प्रलंबित लेखा परीक्षण करताना जास्त भर हा वित्तीय बाबींवर देऊन सदर अहवाल हा अत्यंत थोडक्यात संक्षिप्त स्वरुपात असावा. या कालावधतील किरकोळ स्वरुपाच्या ग्रामपंचायत निवडणूकांसंबंधी किंवा तत्सम प्रशासकीय बाबीवरील त्रुटी सद्यस्थितीत गौण झाल्या आहेत, अशा बाबींचे परिच्छेद टाळण्यात यावेत. म्हणजेच ज्याप्रकरणी वित्तीय अनियमितता, अफरातफर / आर्थिक नुकसान झालेले नाही किंवा पुन्हा पुन्हा त्याच प्रकारच्या चुका नाहीत अथवा ज्या प्रकरणी सद्यस्थितीत कोणतीहि कार्यवाही करण्याचे प्रयोजन शिल्लक राहात नाही, अशा स्वरुपाचे आक्षेप सन २००६-०७ या वर्षाच्या पंलबित लेखा परीक्षणात काढण्यात येऊ नये. यासाठी मुख्य लेखा परीक्षक यांनी प्रलंबित वर्षाचे लेखा परीक्षणासाठी संक्षिप्त लेखा परीक्षण नमुना विहित करावे.

(५) तसेच प्रत्येकी रु. १००० व त्यापेक्षा कमी रकमांच्या आर्थिक व्यवहारात किरकोळ स्वरुपाच्या तांत्रिक त्रुटी असलेल्या परंतु ज्या प्रकरणी कोणताही आर्थिक गैरव्यवहार / अफरातफर झालेले नाही अशा बाबींसंदर्भातील प्रत्येक आक्षेप स्वतंत्र परिच्छेदात नमूद न करता अशा सर्व क्षुल्लक वित्तीय अनियमिततांसाठी एकच परिच्छेद सामायिक यादीसह लेखा परीक्षण अहवालामध्ये समाविष्ट करावा. केवळ मोठया प्रमाणात जाणीवपूर्वक करण्यात आलेल्या आर्थिक गैरव्यवहार / अफरातफरीच्या प्रकरणी प्रत्येक आक्षेपांच्या बाबींवर स्वतंत्र परिच्छेद नोंदवून प्रचलित पध्दतीनुसार कार्यवाही करावी.

(६) त्याचप्रमाणे केवळ <u>कार्यपध्दतीतील</u> उणीवा व त्रुटी ज्यामुळे आर्थिक नुकसान झालेले नाही अशाप्रकरणी वेगवेगळे परिच्छेद नमूद न करता, अशा सर्व अनियमिततेसाठी एकच परिच्छेद सामायिक यादीसह लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट करावा.

(७) अहवालामध्ये प्रामुख्याने गंभीर वित्तीय अनियमीतता, सर्वसाधारण अनियमीतता व अन्य बाबी यांच्याशी संबंधीत परिच्छेदांची वर्गवारी करुन सारांश स्वरुपात लेखा परीक्षण अहवालाच्या प्रथम पृष्ठावर तपशील नमूद करण्यात यावा. ज्याप्रकरणी गंभीर वित्तीय अनियमितता झाली आहे, अशा बाबी नियमानुसार प्रचलित पध्दतीप्रमाणे विनाविलंब जिल्हा परिषदेच्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून द्यावी व नियमानुसार त्यांनी योग्य ती पुढील कार्यवाही करावी. तसेच ज्याप्रकरणी वरील परिच्छेद ५ व ६ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे सर्वसाधारण अनियमितता आढळून आली असेल व ज्याबाबत अन्य वरिष्ठ स्तरावर निर्णय घेणे अपेक्षित नाही, त्या बाबी ग्रामपंचायतीच्या सर्वसाधारण सभेच्या निदर्शनास आणून ठरावाद्वारे पारीत करुन नियमित करण्याबाबतची उचित कार्यवाही करावी. याचबरोबर अन्य उर्वरित बाबी संदर्भातील ज्या प्रकरणी पुढील कोणतीही कार्यवाही करणे अपेक्षित नाही असे वर्गीकृत परिच्छेद संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडे माहितीसाठी व त्याची उचित नोंद घेण्याकरीता पाठविण्यात यावी.

(८) ग्रामपंचायतींचे लेखा परीक्षण अहवाल निर्गमित झाल्यनंतर अहवालातील नमूद आक्षेपांचे अनुपालन हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडून प्रचलित पध्दतीनुसार स्वीकृत करण्यात यावेत.

५. सर्व लेखापरीक्षण अहवाल संगणकावर टंकलिखित करण्यात यावेत व याबाबतची आवश्यक ती उपाययोजना मुख्यलेखापरीक्षक यानी करावी.

६. ग्रामपंचायतींच्या लेखा परीक्षणासाठी संपूर्ण राज्यात एकसूत्रता असावी यासाठी मुख्य लेखा परीक्षकांनी अहवाल सादर करण्यासाठी आवश्यक असलेले आदर्श नमुने तयार करुन ते प्रत्येक जिल्ह्यात अंमलात आणावेत.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर संगणक संकेतांक क्रमांक २००८०७०७११५७३२००१ अन्वये उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार,

(किरण पाटील)
अवर सचिव

प्रति,
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र,मुंबई.

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा )-१, महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल (लेखा परीक्षा )-२, महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल (वाणिज्यिक लेखापरीक्षा ), महाराष्ट्र, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
सर्व उप मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/बांद्रे,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व कोषागार अधिकारी,
निवड नस्ती, वित्त विभाग-कोषागारे-५.